# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २०/०६/२०२५ (शुक्रवार)**

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## ६ गोवंश जनावरांची सुटका, उमरेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक १९/०६/२०२५ रोजी उमरेड पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा ब्राम्हणी मार्गे परसोडी कडे बोलेरो पिकअप वाहन क्र. एम.एच. ४९ डी २९१४ मध्ये अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी ब्राम्हणी ते परसोडी रोड, हेवती फाटा येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान बोलेरो पीकअप वाहन क्र. एम एच. ४९ डी २९१४ हे वाहन मिळुन आले. पोलीसांनी वाहन थांबवुन चालकाने नाव पत्ता विचारले असता **आरोपी क्रं १ चालक नामे रमेश लहानुजी मडावी, वय ३४ वर्षे, रा. परसोडी, हळदगाव, ता. उमरेड अशी माहीती समजली.** पोलीसांनी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये **६ गोवंश जनावरे** असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. आरोपीला जनावरे खरेदी विक्री पावती बाबत विचरणा केली असता त्याचे कडे कोणतेही कागदपत्रे नव्हती. तसेच जनावरांच्या मालकाबाबत विचारपुस केली असता नमुद गोवंश जनावरे हे **आरोपी क्रं २ आसिफ शेख, वय ३४ वर्षे, रा. मोठा ताजबाग, दिघोरी याच्या मालकीचे असुन त्याच्याच सांगण्यावरून जनावरांची वाहतुक करीत असल्याबाबत माहीती आरोपी क्रं १ ने दिली. पोलीसांनी पंचासमक्ष** बोलेरो पीकअप वाहन क्र. एम. एच. ४९ डी २९१४ **किंमती ४,५०,०००/— रूपये. व ६ गोवंश जनावरे किंमती ७५,००० /— रूपये असा एकुण किंमती ५,२५,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला. सुटका केलेल्या ६ गोवंश जनावरांना पालन पोषणाच्या दृष्टीकोणातुन गोसंर्धन संस्थेत दाखल करण्यात आले आहे.**

**नमुद प्रकरणी वर नमुद आरोपी क्रं १ आणि २ यांच्या विरूध्द महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम सहकलम प्राण्यांचा छळ अधिनियम सहकल कलम १३०/१७७ मो.वा.का. अन्वये गुन्हा नोंद केला आहे.**

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये ५ गुन्हे नोंद

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात दिनांक १९/०५/२०२५ रोजी अंमली पदार्थ प्रतिबंध मोहीमे अंतर्गत नागपुर ग्रामीण जिल्हयात अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूध्द कारवाई खालील प्रमाणे गुन्हें नोंद केले आहे.

**पोलीस स्टेशन कन्हान** :— कन्हान पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना **आरोपी क्रमांक १. यो**गेश संजय रायकवार, वय ३५ वर्षे रा. आंबेडकर चौक, कन्हान ता.पारशिवनी, जि. नागपुर, हा आंबेडकर चौक, कन्हान येथे अंमली पदार्थ सेवन करतांना मिळुन आला, **आरोपी क्रं २** नामे शरद देवराव कांबळे, वय ४५ वर्षे, रा. हनुमान नगर, कन्हान हा धरम नगर, कन्हान येथे अंमली पदार्थ सेवन करतांना मिळुन आला. **आरोपी क्रं ३** नामे सुशिल नारायण गजभिये, वय ४२ वर्षे, रा. अशोक नगर, कन्हान, हा गणेश मंदीर मैदानात अंमली पदार्थ सेवन करतांना मिळुन आला.

**पोलीस स्टेशन खापा :—** खापा पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना **आरोपी क्रं १.** नामे अश्विन सुधीर शेंडे, वय ३५ वर्ष रा, देशपांडे आटा चक्की जवळ मोठा इंदोरा, नागपुर शहर, हा वाकी दरबार, भक्त निवास जवळ अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. आणि **आरोपी क्रं २** नामे श्रावण बापुराव दुपारे, वय ६५ वर्ष, रा. इंदिरा नगर, जरीपटका नागपुर शहर, हा लष्करशहा दर्गा परीसरात येथे अंमली पदार्थ सेवन करतांना मिळुन आला.

नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत अंमली पदार्थ सेवन करणाऱ्या एकुण ५ आरोपीतांवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये ५ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

## पोस्टे बोरी हद्दीत सट्टापट्टीचा जुगार चालविणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन बोरी:—** दिनांक १९/०६/२०२५ रोजी बोरी पोलीसांना गोपनीय माहिती मिळाली की, बोरकुटे कॉम्प्लेक्स समोर एका गाळयामध्ये बुटीबोरी येथे काही इसम लोकांकडुन पैसे घेवुन कल्याण मटक्याचे आकडे लावुन हारजीतचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी सापळा रचुन धाड टाकली असता बोरकुटे कॉम्प्लेक्स बुटीबोरी समोरील रिकाम्या पडीत गाळयामध्ये आरोपी कं **१) नितेश मनोज राठोड वय. २३ वर्षे, रा. भारकस ता. जि. नागपुर हा आरोपी क्र. २) निखीलेश गोपाल पाठक ,वय २३ वर्षे, रा बुटीबोरी, जि. नागपुर याचे कडुन पैसे घेवुन कल्याण मटका चे आकडे लिहतांना मिळुन आला. आरोपी क्र १ ची विचारपुस केली असता आरोपी कं ३) शुभम नथ्थुजी कांबळे रा. बुटीबोरी यांच्या सांगण्यावरून तो सट्टापट्टी चालवित असल्याबाबत माहीती प्राप्त झाली.**

**पोलीसांनी घटनास्थळावरून रोख रक्कम २,८५०/— रूपये, कल्याण सट्टापट्टीचे आकडे लिहलेली चिठ्ठी व कार्बन, बुक एक ॲन्ड्रॉईड मोबाईल असा एकुण १२,८५५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

**नमुद आरोपीतांविरूद्ध कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम सह कलम ४९ भा.न्या. सं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैध शस्त्र बाळगणाऱ्या अरोपीतांविरूध्द २ गुन्हे नोंद
## स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण जिल्हा यांचे पथकांनी अवैध शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीविरूध्द कारवाई करून खालील प्रमाणे दोन गुन्हे नोंद दाखल केले.**

**पो.स्टे. मौदा** :— दिनांक १९/०६/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाला गोपनीय माहिती मिळाली की, पोलीस स्टेशन मौदा हद्दीत वडोदा येथे एक इसम अवैधरित्या शस्त्र घेवुन फिरत आहे. त्यामुळे लोकांच्या मनात भिती निर्माण झाली आहे. पोलीस तात्काळ वडोदा येथे गेले असता एक विधीसंघर्षग्रस्त बालक हा वडोदा येथील नागपूर मौदा हायवे रोडचे सर्विस

रोडवर स्वत:चे जवळ एक धारधार चाकु बाळगुन मिळुन आला. पोलीसांनी पंचासमक्ष विधीसंघर्षग्रस्त बालाकाच्या ताब्यातुन धारदार शस्त्र एक चाकु जप्त केला आहे.

**विधीसंघर्षग्रस्त बालकाविरूद्ध पोस्टे मौदा येथे कलम ४/२५ शस्त्र अधिनियम १९५९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.**

**पो.स्टे. रामटेक** :— दिनांक २०/०६/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाला गोपनीय माहिती मिळाली की, पोलीस स्टेशन रामटेक हद्दीत नगरधन येथे राहणारा आकाश कांमडी याचे कडे तलवार आहे. मिळालेल्या महीतीच्या अधारे पोलीस तात्काळ नगरधन येथे जावुन आरोपी नामे आकाश मनोहर कामडी, वय २५ वर्षे, रा. वार्ड क्र ४ नगरधन, ता. रामटेक जि नागपुर याला ताब्यात घेवुन त्याची विचारपुस केली असता त्याने त्याचे जवळ विना परवाना तलवार बाळगत असल्याचे सांगितले. पोलीसांनी पंचासमक्ष नमुद आरोपीच्या ताब्यातुन धारदार शस्त्र एक तलवार जप्त केली आहे.

आकाश मनोहर कामडी, वय २५ वर्षे, रा. वार्ड क्र ४ नगरधन, ता. रामटेक जि नागपुर याच्या **विरूद्ध पोस्टे रामटेक येथे कलम ४/२५ शस्त्र अधिनियम १९५९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.**



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने